जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/२९७०३५/२०२३

वाहतुक नियंत्रण अधिसुचना — दिनांक - ०८/०८/२०२३

सांगवी वाहतुक विभाग हद्दीमध्ये कोकणे चौक ते पार्क स्ट्रिट सोसायटी ते कोकणे चौक दरम्यान रोडवर दररोज मोठ्या प्रमाणात दुचाकी व चारचाकी वाहनांची वर्दळ चालु असते. कोकणे चौक ते रघुनाथ गोडांबे चौक दरम्यान रस्त्याच्या दोन्ही बाजुस दररोज दुचाकी व चारचाकी वाहणे पार्क केलेली असतात त्यामुळे सदर ठिकाणी वारंवार वाहतुकीची कोंडी होवुन वारंवार किरकोळ व गंभीर स्वरुपाचे अपघात होत असतात.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**सांगवी वाहतुक विभाग अंतर्गत**

| अ.क्र. | ठिकाण | निर्बंध |
|---|---|---|
| १. | कोकणे चौक ते एन एस स्नॅक्स सेंटर पर्यंत मेन रोडवर | नो पार्किंग |
| २ | रघुनाथ गोडांबे चौक ते कोकणे चौक पर्यंत मेन रोडवर | नो पार्किंग |
| ३ | रघुनाथ गोडांबे चौक ते कोकणे चौक चौपाटी पर्यंत सर्व्हिस रोडवर | नो पार्किंग |

तरी वरील ठिकाणी नो पार्किंग झोन घोषीत केलेबाबत अंतिम अधिसुचना (नोटीफिकेशन) करण्यात येत आहे.

सदर अधिसुचनेची अमंलबजावणी ०८/०८/२०२३ पासुन करण्यात येत आहे.

(काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त,परि २
अति. कार्य वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी सांगवी वाहतुक विभाग

४) कार्याकारी अभियंता ड क्षेत्रीय कार्यालय पिंपरी चिंचवड महानगरपालिका
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner